# नांदेड शहरातील उर्दू माध्यमाच्या शाळांतील माध्यमिक स्तरावरील मुस्लिम मुलींना शिक्षणात येणा—या समस्यांचा — चिकित्सक अभ्यास

संशोधक
सय्यद युनुस परवेज सय्यद युसुफ
एम.फिल. प्रशिक्षणार्थी

मार्गदर्शिका
डॉ. सुनिता पाटील
एम.एस्सी., एम.एड., एम.फिल., पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)

## १ प्रास्ताविक :

२१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम व संतुलीत समाज निर्माण करणे गरजेच आहे. येणाऱ्या काळात भारताला अनेक आव्हाणांना सामोरे जावे लागणार आहे. जसे की आज कोरोनाच्या रूपाने आपल्या समोर नवे आव्हाण 'आ' वासून उभा आहे. एवढेच नव्हेतर भारता समोर निर्माण होऊ शकणारी आव्हाणे म्हणजे आर्थिक मंदी, दहशतवाद, परकीय आक्रमणाची शक्यता, महागाई, भूक बळी, जातियता, राजकिय अस्थैर्य यामुळे भारतात बिकट परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

शिक्षणाची मुलभूत उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी तसेच जागतिकीकरणाने उच्च शिक्षण क्षेत्रात निर्माण केलेल्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी देशातील महाविद्यालय व शैक्षणिक संस्था सर्व दृष्टीने सक्षम होणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी नव्या पिढीला कालानुरुप गुणात्मक, विकासात्मक व मुल्यात्मक शिक्षण देणारी यंत्रणा, प्रशिक्षित शिक्षक व मानवी संस्थाधने उभी करणे ही काळाची गरज आहे.

स्त्रीला समाजात मानाचे स्थान असावयास पाहिजे. स्त्री व पुरुष ही एकाच रथाची दोन चाके आहेत. मानवाचा विकास करावयाचा असेल तर हया दोन्ही चाकांचा (स्त्री-पुरुष) समान व सर्वांगींण विकास झाला पाहिजे. परंतु भारतामध्ये पुरुषप्रधान पितृसत्ताक पध्दती पूर्वपार चालत आलेली आहे व पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्री हा समाजघटक केवळ शोषितच नव्हे तर वंचित ही राहिलेला आहे. म्हणून तर कवी मैथिलीशरण गुप्त यांनी भारत-भारतीमध्ये म्हटलेले आहे,

अबला जीवन हाय तुम्हारी यही कहानी ।
ऑंचलमे है दूध और नयनोंमे पानी ।

महात्मा जोतीबा फुले, महर्षी धोंडोकेशव कर्वे, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई इत्यादी समाज सुधारकांनी या परिस्थिती विरुध्द बंड केले. म्हणून तर आजची स्त्री किमान उंबरठा ओलंडून बाहेर पडण्याची हिंमत तरी दाखवू शकली. प्रसिध्द फ्रेंच समाजवादी चार्लस केरियर याने म्हटले की,

"एखाद्या राष्ट्राकडून स्त्रीला दिल्या जाणा-या सामाजिक व राजकीय महत्वापासून राष्ट्राची सांस्कृतिक उंची मोजता येते".

### १.१ संशोधन समस्या विधानः

'नांदेड शहरातील उर्दू माध्यमाच्या शाळांतील माध्यमिक स्तरावरील मुस्लिम मुलींना शिक्षणात येणा-या समस्यांचा चिकित्सक अभ्यास'.

प्रस्तुत संशोधन अभ्यासात संशोधन साधनांच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीचे संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन प्रकरण चार मध्ये केलेले आहे. व संकलित माहितीच्या आधारे संशोधनात्मक निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात आलेले आहेत.

संशोधनाचे निष्कर्ष मांडताना प्रत्येक संशोधन साधनातून मिळालेल्या माहितीचे ज्या क्रमवारीने संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे. त्याच क्रमाने मांडण्यात आलेली आहेत. निष्कर्ष लिहीतांना प्रश्नावलीतील प्राप्त माहिती क्रमाने मांडण्यात आलेली आहे व ही माहिती टक्केवारीच्या स्वरूपात मांडली आहे. त्यामूळे सरासरी ५०

टक्के माहिती किंवा त्याहून अधिक मूल्य धारण करणा-या प्रतिसादित माहितीस सकारात्मक समजून निष्कर्ष काढले आहेत. व ५० टक्के कमी मूल्य धारण करणारी प्रतिसादित माहिती नकारात्मक व अविश्वसनीय समजून निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- उर्दू माध्यमाच्या शाळांतील माध्यमिक स्तरावरील मुस्लिम मुलींना येणा-या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे.
- उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणा-या मुस्लिम मुलींच्या कौटुंबिक परिस्थितीचा त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.
- माध्यमिक स्तरावर शिक्षण घेतांना मुस्लिम मुलींना येणा-या सामाजिक समस्यांचा शोध घेणे.
- उर्दू माध्यमातील माध्यमिक स्तरावरील मुस्लिम मुलींना शिक्षणात येणा-या समस्यांवर उपाय सुचविणे.

**संशोधन पध्दती**

संशोधन म्हणजे काय?

१.संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्तीसाठी केलेल्या पध्दतशीर प्रयत्न होय. रेडमन

२."Research is a typical process by which scientific knowledge is advanced. In an orderly manner by unitary quauta of sufficient size as the basis of previous knowledge and necessary assumptions regarding the nature of the field"

संशोधन म्हणजे तथ्ये किंवा तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण होय. किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासठी सतत पध्दतशीर केलेले परिश्रम

**संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपूर्ती होण्यासाठी संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला.**

**नमूना निवड पद्धती :**

प्रस्तुत संशोधनाकरिता नमूना निवड सहेतुक यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली.

**संशोधनाची साधने :**

संशोधणाची जी उद्दिष्टे ठरविली आहेत त्या अनुषंगाने ज्या परिकल्पना मांडल्या आहेत. त्याचे मूल्यांकंन करून अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी आधारभूत सामग्री तथ्य संकलनासाठी संशोधनाच्या साधनाची निवड केली ज्याद्वारे माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून संशोधनाचे निष्कर्ष मांडता येतील साधारणतः शैक्षणिक संशोधनात (शालेय सर्वेक्षण) पुढील साधनांचा उपयोग केला जातो.

- निरीक्षण
- मुलाखती
- प्रश्नावली
- अभिवृत्ती मापिका
- शोधिका
- पडताळा सुची
- पदनिश्चयन श्रेणी
- प्रक्षेपण तंत्रे
- मतावली
- प्रमाणित चाचण्या
- समाजमिती तंत्रे
- अंकपत्र

या संशोधनाच्या विविध साधनांपैकी काही साधने संख्यात्मक माहिती मिळविण्यासाठी उपयोगात येतात तर काही साधनांद्वारे गुणात्मक आधार सामग्री संकलित करता येते संशोधनाच्या दृष्टिने निष्कर्षाची यथार्थता स्पष्ट करण्यासाठी गुणात्मक माहितीचे परिमाणात्मक (संख्यात्मक) आधार सामग्रीत रूपांतर करणे अत्यंत उपयुक्त व आवश्यक असते. यापैकी काही साधणे परिमाणी करणास सहायक ठरतात कशा प्रकारची माहिती हवी आहे व कोणते उद्दिष्ट साधावयाची आहेत. त्यावरून कोणते साधन उपयोगात आणता येईल ते ठरवावे लागते.

**प्रस्तुत अध्ययनात संशोधनाकरिता आवश्यक असलेली माहिती संकलित**

करण्याकरिता विविध साधनाचा उपयोग करण्यात आला.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या परिणामांच्या आधारे असा निष्कर्ष काढण्यात आले.

१. नांदेडशहरातील उर्दू माध्यमाच्या माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेणा-या मुस्लिम मुलींना शैक्षणिक समस्या आहेत. त्यात घरापासून शाळेचे आंतर जास्त असणे, विषय अवघड वाटणे, पुरेसे शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसने, मुलींचे खेळाचे तास न होणे, मराठी विषय शिक्षकांची कमतरता इ. प्रमुख समस्या आढळून आल्या.
२. उर्दू माध्यम शाळांमध्ये संगणकाची उपलब्धता नाही व शाळांमध्ये मुस्लिम मुलींना संगणक शिकवल्या जात नाही.
३. मुस्लिम समाजात मुलीपेक्षा मुलांच्या शिक्षणाला प्राधाण्य दिले जाते.
४. मुस्लिम मुलींची एखाद्या विषयात मागासलेपणा असणे ही सुध्दा एक समस्या आहे. अवघड विषयात गणित हा विषय अग्रक्रमावर असून त्यापाठोपाठ मराठी हा विषय आहे.
५. बहुतेक मुस्लिम मुलींना अभ्यासातील अडचणी दुर करण्यासाठी कोणीही मदत करत नाही याचे कारण म्हणजे घरातील सदस्यांना वेळ मिळत नाही व अशिक्षितपणा असल्यामुळे.
६. बहुतेक मुस्लिम मुलींच्या पालकांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने ते पुढील शिक्षणासाठी मुलींना परवानगी देत नाहीत.
७. मुस्लिम मुलींना आईला घरकामात मदत करावी लागते व लहान भावंडाना सांभाळावे लागते त्यामुळे शिक्षण घेण्यास अडचणी येतात व शैक्षणिक नुकसान होते.
८. नोकरी मिळत नसल्यामुळे मुस्लिम मुलींमध्ये पुढील शिक्षणाबद्‌दल अनास्था आहे.
९. मुस्लिम मुलींच्या कुटुंबातील सदस्यसंख्या ही पाच ते सात आहे व कमवत्या व्यक्तींची संख्या एक असल्याने मुस्लिम मुलींच्या शिक्षणविषयक गरजा कुटुंबाकडून पुरवल्या जात नाहीत व त्याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होतो.
१०. मुस्लिम समाजातील पालकांचा सहशिक्षणास विरोध आहे व मुलींनाही कन्याशाळेत शिक्षण घ्यावे वाटते. परंतु कन्या शाळा कमी असल्याने माध्यमिक शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही.

मुस्लिम समाजातील पालकांचा सहशिक्षणास विरोध आहे व मुलींनाही कन्याशाळेत शिक्षण घ्यावे वाटते. परंतु कन्या शाळा कमी असल्याने माध्यमिक शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही.

**संदर्भग्रंथ सूची**

1. **मुळे, रा.शं. आणि उमाठे, वि.तु.,** (१९८७), *शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे,* (दुसरी आवृत्ती), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर - ०१.
2. **बापट, भा.गो.,** (१९८८), *शैक्षणिक संशोधन,* (तृतीयावृत्ती), नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.
3. **डॉ.भिंताडे, वि. रा.,** (२००४), *शैक्षणिक संशोधन पध्दती,* (प्रतिरुप आवृत्ती) नूतन प्रकाशन, पुणे.
4. **जोशी, डॉ. अनंत व महाले, डॉ.संजीवनी,** (१९९९), *मुक्त विद्यापीठीय संशोधन,* पुष्प पहिले, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
5. **जोशी, डॉ.अनंत आणि महाले संजीवनी,** (१९९९), *संशोधन अहवालाची लेखन पध्दती,* पुस्तक चौदावे, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

6. **डॉ. पाटील लिला,** *आजचे शिक्षण आजच्या समस्या*

7. **पवार,ना.ग.,** *शालेय शिक्षणाच्या समस्या*

8. **डॉ माळी, मा. गो.,** *आधुनिक शिक्षणाच्या समस्या*

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com